प्रगतिशील शेतकरी महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास (जिजामाता कृषिभूषण पुरस्कारप्राप्त)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र या विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

स्वाती हरिभाऊ काटे

सहाय्यक प्राध्यापक आणि विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज नांदेड

मार्गदर्शक

डॉ रामचंद्र भिसे

विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग

दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर, जिल्हा नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मार्च २०२२

प्रस्तावना

मानवनिर्मित समाजव्यवस्थेचा विचार स्त्रीशिवाय होऊ शकत नाही. मानवाच्या विकासासंदर्भात शेतीचा शोध महत्त्वाचा मानला जातो. इतिहासकारांच्या मते शेतीचा शोध स्त्रियांनीच लावला आहे. आपला देश कृषीप्रधान देश आहे. परंतु स्त्री आणि पुरुषांना मात्र कृषी व्यवसथेत एकसमान स्थान नाही. कृषीचे क्षेत्र आज पुरुषांच्या मालकिचे असलेले दिसते. शेतीमध्ये कष्ट करणाऱ्या प्रत्यक्ष राबणा-या स्त्रियांची संख्या मोठी असली तरी, ज्यांच्या नावे शेती आहे, अशा महिला शेतकऱ्यांची संख्या मात्र अल्प आहे.

जेव्हा जिजामाता कृषीभूषण पुरस्कार या शासनाच्या वतीने महिला शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या पुरस्काराविषयी कळाले तेव्हा आश्चर्यही वाटले. एक महिला शेतकरी शासनाच्या पुरस्काराने सन्मानित होते ही कौतुकास्पद घटना आहे. महिला शेतीच करतात असे नाही तर त्या क्षेत्रात सर्वोच्च असा पुरस्कार देखील मिळवतात ही अभिमानाची बाब आहे. शेतीसारख्या व्यवसायात स्त्रीने स्वतःची स्वतंत्र ओळख तयार करावी आणि पुरस्कार मिळवावा यासाठी स्वतःच्या कुटुंबाचे मन वळवणे, शेतीमध्ये नवीन प्रयोग करून ते यशस्वी करणे, तसेच शेती ही देखील आर्थिक उत्पन्नाचे साधन बनू शकते आणि पुरुष सत्ताकपद्धतीच्या व्यवस्थेत शेतकरी महिला स्वतःच्या कुटुंबासोबत स्वाभिमानाने जगू शकतात, हा प्रवास एका शेतकरी महिलेसाठी खूपच कष्टाचा असणार असे मला जाणवले.

यामुळे प्रस्तुत विषयावर संशोधन करावे याबाबत माझ्या मनात जिज्ञासा निर्माण झाली. शेती करत असताना महिला शेतकऱ्यांना कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते? ती साक्षर असली किंवा निरक्षर असली तर तिला तिच्या कामात पुरुषांची मदत मिळते का? असे काही प्रश्न डोकावले आणि त्यांची उत्तरे मिळवण्यासाठी महिला शेतकऱ्यांचे जीवन जाणून घेतले पाहिजे असे वाटले. परिणामी माझ्या संशोधनासाठी प्रगतिशील शेतकरी महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा सामाजिक दृष्टिकोनातून जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी महिलांचा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे

विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

ज्या महिला शेती करतात, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नव्वदच्या दशकापर्यंत कोणताही विशेष पुरस्कार दिला जात नव्हता. असे का? या मागच्या पार्श्वभूमीचा समाजशास्त्रीय अभ्यास होणे गरजेचे आहे असे वाटले. यासोबतच प्रगतिशील महिला शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीची प्रत्यक्ष पाहणीदेखील करावीशी वाटली

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी विविध योजना राबवल्या होत्या. कृषी विद्यापीठांच्या कार्याचा विस्तार करणे, कृषी अवजारे विकसित करणे, नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, अशा विविध योजना त्यांनी सुचवल्या. याचाच संदर्भ घेऊन वसंतरावजी नाईक यांनी कृषीभूषण पुरस्कार, कृषीरत्न पुरस्कार अशा योजना कार्यान्वित केल्या.

जिजामाता कृषीभूषण पुरस्काराचे स्वरूप

राज्यातील शेती क्षेत्राची सातत्याने होत असलेली प्रगती व या प्रगतीत उत्पन्न वाढीत महिलांचाही मोठा वाटा आहे. व तो सातत्याने वाढत असून शेती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळीत महिला सातत्याने पुढे येत आहेत, शेती विकासाच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. तसेच शेती क्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन, त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा; अशा महिलांच्या कार्याने प्रभावित होऊन इतर

महिलांमध्ये जागृती निर्माण होण्याच्या उद्देशाने इस १९९५ पासून महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत कृषीभूषण पुरस्कारांच्या धर्तीवर फक्त महिलांसाठीच जिजामाता कृषीभूषण पुरस्काराची सुरुवात करण्यात आली.

राज्यातून दरवर्षी पाच महिला शेतकऱ्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. पुरस्कारार्थी महिलांना प्रत्येकी ५०००० रुपये रोख आणि सन्मानचिन्ह तसेच पतीसह सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार निवडीसाठी माननीय कृषिमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमार्फत राज्यातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन, सदर समितीने निवड केलेल्या महिला शेतकऱ्यास हा पुरस्कार देण्यात येतो. प्रगतिशील महिला शेतकरी स्वतःच्या मेहनतीने आपली आर्थिक स्थिती सुधारतात. स्वतःचे सामाजिक जीवन सक्षम बनवतात आणि सोबतच आपले कौटुंबिक जीवन आनंदाने जगतात.

संशोधनाची उद्दिष्टे

१. जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त महिला शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त महिला शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त महिला शेतकऱ्यांच्या कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करणे.
४. कृषी क्षेत्रातील स्त्रियांच्या भूमिकांचा विचार करणे.
५. पुरुषसत्ताक पद्धती व लिंगभेदाच्या संदर्भात जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त महिला शेतकऱ्यांना आलेल्या अनुभवांचे विश्लेषण करणे.
६. पुरुषसत्ताक पद्धतीत शेतकरी महिलांना आलेल्या अनुभवांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती

महिला शेतकरी याविषयी गुणात्मक पद्धतीने सखोल अभ्यास करण्यासाठी व्यष्टी अध्ययन पद्धतीचा वापर करण्यात येईल. हर्बर्ट स्पेन्सर या समाजशास्त्रज्ञाने वेगवेगळ्या संस्कृतीच्या तुलणात्मक अध्ययनात व्यष्टी अध्ययन पद्धतीचा वापर केला आहे.

फिलिंग यांच्या मते, व्यष्टी अध्ययनपद्धती कोणत्यातरी एका सामाजिक एककाचे मग ती एक व्यक्ती, कुटुंब, संस्था, सांस्कृतिक वर्ग किंवा जाती यांच्या जीवनाचे संशोधन आणि विवेचन करण्याची पद्धत आहे.

या संशोधन पद्धतीच्या माध्यमातून एका व्यक्तीला आपल्या अध्ययनाचा एकक म्हणून व्यक्तिगत जीवनाच्या अध्ययनासाठी मदत होऊ शकेल. निष्पक्ष संशोधनासाठी ही पद्धत गरजेची आहे.

समाजशास्त्रामध्ये अभ्यासल्या जाणाऱ्या संकल्पनांचा व वैचारिक लेखनाचाही आधार प्रस्तुत संशोधनासाठी घेण्यात येईल.

स्त्री सबलीकरण, स्त्रीविकास, लिंगभाव, कृषीव्यवस्थेतील चर्चा, उदारमतवादी स्त्रीवाद या वैचारिक दृष्टिकोनांचा वापर संशोधनासाठी केला जाईल. संशोधनासाठी सर्व संभाव्य निवड नमुना पद्धतीतील सहेतूक नमुना निवड पद्धती वापरली जाणार आहे.

प्राथमिक आणि दुय्यम पद्धतीने तथ्य संकलन करणार आहे. प्राथमिक पद्धतीच्या संकलनात प्रामुख्याने अनुसूची आणि निरीक्षण पद्धतीचा वापर असणार आहे.

वर्णनात्मक संशोधना आराखड्याचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी केला जाणार आहे.

त्यासोबतच प्रत्यक्ष संशोधन करत असताना कोणकोणत्या अडचणी आल्या याचेही विश्लेषण केले जाईल. जिजामाता कृषिभूषण पुरस्कार प्राप्त महिला शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी आणि मुलाखती यावर भर असणार आहे.

संशोधनासाठी महाराष्ट्र राज्य हे क्षेत्र निवडलेले असून यातील विविध प्रदेशातील निवडक जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त महिला शेतकऱ्यांचा अभ्यास सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने केला जाईल. १९९५ ते २०२१ या काळातील निरनिराळ्या प्रादेशिक विभागातील प्रतिनिधीक एकूण २१ महिला शेतकऱ्यांचा अभ्यास केला जाईल.

अध्ययनाचे महत्त्व

प्रस्तुत शोध विषयाचे महत्त्व खालील प्रमाणे आहे :

१. महिला शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जिजामाता कृषीभूषण पुरस्कार सारखे पुरस्कार व्यापक प्रमाणात दिले जावेत.
२. महिलांचे सबलीकरण आणि कृषी व्यवस्थेतील महिलेला प्रोत्साहन देण्यासाठी हे अध्ययन महत्त्वाचे आहे.
३. महिलांच्या विकासासाठी प्रस्तुत संशोधनातून मार्गदर्शनपर माहिती मिळू शकेल.
४. आर्थिक स्वावलंबी होण्यासाठी शेती हे क्षेत्र महिलांसाठी महत्त्वाचे आहे. ते या संशोधनातून निदर्शनास येईल.

प्रकरणांचा तपशील

प्रस्तुत अभ्यास विषयाची मांडणी पुढील प्रकरणांमधून करण्यात येईल

१. विषयाची ओळख
२. संशोधन पद्धती
३. साहित्याचा आढावा
४. तथ्य संकलन : जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी महिलांचा व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या सहाय्याने अभ्यास
५. तथ्य विश्लेषण

५.१ जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी महिलांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास.

५.२ जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास.

५.३ जिजामाता कृषीभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी महिलांच्या कौटुंबिक स्थितीचा अभ्यास.

५.४ वर्तमानकालीन तंत्रज्ञान आणि सामाजिक परिवर्तने यांच्याशी शेतकरी महिलांनी केलेले समायोजन यांचा अभ्यास

६. निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भसूची

डॉ. आगलावे प्रदीप, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन, नागपूर
डॉ. कर्वे स्वाती, स्त्री विकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, पुणे
डॉ. पाटील पद्मजा, डॉ. जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर
भांडारकर पू. ल., सामाजिक संशोधनपद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर
डॉ. भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे
डॉ. ढमढेरे एस. व्ही., डॉ. काळे संभाजी, संशोधनपद्धतीच्या मूलभूत संकल्पना, डायमंड प्रकाशन, पुणे
मोहंती सुगता, विकासाच्या प्रक्रियेतील स्त्रीप्रश्न, स्त्री अभ्यास केंद्र, पुणे
महिला धोरण असे असावे? स्त्रीमुक्ती आंदोलन, पुणे
साळुंखे श्रीकांत, शेतकरी चळवळ, बी रघुनाथ प्रकाशन, परभणी
प्रा. मुलजाधव सुशीला, भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद
डॉ. ओम्वेट गेल, ज्योतिबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार, लोकवाङ्मय गृह, मुंबई
दो. मेहेत्रे स्मिता, भारतीय स्त्री आणि मानवअधिकार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
चिल्ले रमेश, शेतकऱ्यांच्या यशोगाथा, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे
Krishnaraj Maithreyi, Kanchi Aruna, women farmers of India, NBT, Delhi
राणा अशोक, सिंधू जणांची मातृदेवता निऋती, जिजाऊ प्रकाशन, पुणे
रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा १९ वे शतक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
खडपेकर विनया, स्त्रीस्वातंत्र्य वादिनी: विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
भागवत कमल आणि इतर, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक प्रकाशन, पुणे
पटेल रजिया, जागतिकीकरण, धर्मांधता व स्त्री, सुगावा प्रकाशन, पुणे
शेतकरी, बळीराजा इत्यादी नियतकालिकांचे अंक
Krishi.maharashtra.gov.in
Vikaspedia.in
Kisanvani.com
farmer.gov.in
Ibef.org
agricoop.nic.in
India.gov.in
Niti.gov.in

मार्गदर्शक : डॉ रामचंद्र भिसे, विभागप्रमुख समाजशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर

संशोधक: स्वाती हरिभाऊ काटे, विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड